मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक १ जानेवारी २०२४ । पान १

# शहरात पर्यावरणासाठी विविध संस्थाकडून जनजागृती पदयात्रा

## ३१ डिसेंबर रोजी पर्यावरण जनजागृती पदयात्रा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातील प्रदुषण तसेच इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठी दि.३१ डिसेंबर रोजी पर्यावरण जनजागृती पदयात्रा देहू ते आळंदीपर्यंत काढण्यात आली. यामध्ये विविध सामाजिक संस्थानी सहभाग घेतला होता. आपल्या पिढीला वाचवण्यासाठी व एक स्वच्छ सुंदर पर्यावरण देण्यासाठी देहू ते आळंदी असा प्रवास करत पर्यावरण लढ्याचा संदेश देण्यात आला. यावेळी प्रशांत राऊळ यांनी या पर्यावरण जनजागृती पदयात्रेत सहभागी झालेल्या सामाजिक ,राजकीय व आध्यात्मिक संस्थेचे आभार मानले. नदीच्या ज्या प्रणाली आहेत,ओढे व नाले ,झरे यावर अतिक्रमण होत आहेत.त्यांचे जीवन संपवले जात आहे.या नदीच्या या प्रणाली संपवतो त्यामुळे नदी संपवतो. नदीला जीवनदाहिनी म्हटले जाते.जीवनदाहिनी संपली तर आपण संपणार आहोत. हे कुठं तरी कळाले पाहिजे.आपण पुढच्या पिढी साठी काय सोडून चाललो आहोत,विषारी पाणी,विषारी अन्न विषारी वायू ज्याच्या मुळे त्यांना रोगीआरोग्य देऊन चाललो आहोत.



# भाजपा शहर उपाध्यक्षपदी ढोरे

**चिखली**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) उपाध्यक्षपदी जवाहर मनोहर ढोरे, कुणाल लांडगे तर सरचिटणीसपदी गणेश ढोरे यांची निवड करण्यात आली आहे. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देवून ही निवड जाहीर करण्यात आली.

जवाहर ढोरे हे माजी महापौर माई ऊर्फ उषा ढोरे यांचे चिरंजीव आहे. तर कुणाल लांडगे हे स्वीकृत नगरसेवक आहेत. जवाहर ढोरे, कुणाल लांडगे आणि गणेश ढोरे यांचे आजपर्यंतचे सेवाभावी कार्य पाहता त्यांना राष्ट्रीय पक्षाचे पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी देण्यात येत आहे. पक्षाचे काम चांगल्या प्रकारे करून जनसेवा व भारतीय जनता पार्टीचा प्रचार, प्रसार करून कामगीरी उंचावणार असल्याचा विश्वास शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे. जवाहर ढोरे, गणेश ढोरे यांनी सांगवी परिसरात सामाजिक, धार्मिक, आरोग्य सेवा कार्यातून आपली छाप पाडली असून अनेक सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार असतो. तर कुणाल लांडगे यांना २०१७ मध्ये भाजपाची अधिकृत उमेदवारी देण्यात आली होती. खुप कमी मतांनी त्यांचा पराभव झाला होता. २०१८ ला पक्षाकडून स्विकृत नगरसेवक पदी त्यांची वर्णी लागली होती. स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप व उद्योजक उमेश चांदगुडे यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख आहे.

# मोशी उपबाजारात पालेभाज्यांच्या आवकमध्ये वाढ

## पालेभाज्यांची आवकमध्ये १५ टक्क्यांनी वाढ झाली

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शेतीमालाच्या उत्पन्नास अनुकूल वातावरण असल्याने मोशीतील श्री नागेश्वर महाराज उपबाजार समिती मोशी येथे मागील आठवड्यापेक्षा पालेभाज्यांची आवकमध्ये १५ टक्क्यांनी वाढ झाली असून भाव स्थिर आहेत. कोथिंबीर २५ हजार २००, मेथी ८ हजार ८००, शेपू २ हजार ६००, पालक ६ हजार ३००, कांदापात ४ हजार ९००, पुदिना ४ हजार ३००, मुळा ८०० आदी पालेभाज्यांची राज्यातील विविध जिल्ह्यातून एकूण आवक ५४ हजार ४०० जुड्या इतकी झाली आहे. ही आवक मागील आठवड्यापेक्षा १५ टक्क्यांनी वाढली. मात्र पालेभाज्यांसह फळभाज्या व फळांचे भाव स्थिर आहेत. फळभाज्यांमध्ये कांदा ४०८, बटाटा ६०५, टोमॅटो ४९९, मटार ३११, फ्लॉवर २६६, कोबी १८५, गाजर २५२, मिरची १३६, घेवडा ४५, भेंडी ५६, काकडी १३६, ढोबळी मिरची ४७, वांगी ३५ आदी फळभाज्यांची एकूण आवक ३ हजार २९२ क्विंटल झाली आहे. फळांमध्ये कलिंगड, सफरचंद, शहाळे, पपई, अननस, खरबूज, संत्री, मोसंबी, केळी आदी फळांचीही आवक स्थिर असून भावही स्थिर आहेत.३ हजार २९२ कांदा : गोल्टा : ३५ ते ४०, चांगला : ४५ ते ५०, बटाटा : १८ ते २०, लसूण १५० ते २००, आले : ७० ते ८०, भेंडी : ३५ ते ४०, गवार : ५० ते ६०, टोमॅटो : ३० ते ४०, मटार : ३० ते ४०, घेवडा : ३० ते ४०, दोडका : ३० ते ४०, घोसाळे : ३० ते ४०, मिरची : काळी लवंगी : ६० ते ७०, ज्वाला : ५० ते ६०, मोठी लांब मिरची : ४० ते ५०, ढोबळी : ३० ते ४०, भोपळा : दुधी : २० ते ३० लाल : २० ते ३०, ढेमसे : ४० ते ५०, परवर : ३० ते ४०, , बीट : ४० ते ४५, कोहळा : ४० ते ४५, पावटा : ५० ते ६०, वाल : ४० ते ५०, वालवर : ५० ते ६०, शेवगा : ७० ते ८०, चवळी : ४० ते ५०, कैरु : ५० ते ६०, मका कणीस : १५ ते २०, लिंबू : ४० ते ५० बाजारभाव एका जुडीचा (रुपयांमध्ये)

हरभरा गड्डी : १० ते १२, कोथिंबीर : ८ ते १०, मेथी : १० ते २०, शेपू : ६ ते ८, कांदा पात : १० ते १५, पालक : ६ ते ८, मुळा : १० ते १२, चवळी : ८ ते १०, करडई : ८ ते १०, राजगिरा : ८ ते १०, चाकवत : ८ ते १०, अंबाडी : ८ ते १०, पुदीना : ३ ते ५, लाल माठ : १० ते १२, आळू : १० ते १२, कढीपत्ता : ४० ते ५० बाजारभाव एका किलोचे (रुपयांमध्ये) सफरचंद : हिमाचल प्रदेश रॉयल, गाला, स्पर, रेड गोल्डन सफरचंद : १५० ते १६० रुपये किलो. परदेशी : १४० ते १५०, पिअर : १०० ते ११०, किवी : ७० ते ८० एक बॉक्स, मोसंबी : ७० ते ८०, संत्री परदेशी : ९० ते १००, , खरबूज ३० ते ४०, चिकू : ५० ते ६०, सीताफळ : ६० ते ७०, केळी : ४० ते ५०, सोनकेळी : ९० ते १००, आलुबुकार : ८० ते ९०, शहाळे : ४० ते ५०, अननस : ३५ ते ४०, आवळा : ५० ते ६०, ड्रॅगन फ्रूट : ५० ते ६० रु

# मावळची जनता विकासाला मत देणार

## 'हॅट्रिक' तर होणारच : खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** २०२४ चा निकाल लागेल तेव्हा तुम्हाला कळेल की श्रीरंग बारणे यांची हॅट्रिक झाली म्हणून.. मावळ लोकसभा मतदारसंघात केलेल्या कामाच्या जोरावर मी निवडणूक लढवणार आहे. मतदारच कोणाला निवडून द्यायचे हे ठरवत असतो. त्यामुळे मावळची जनता विकासाला मत देतील असा विश्वास खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी चिंचवडमधील राष्ट्रवादीचे नेते संजोग वाघेरे यांनी आज शिवसेनेत (उद्धव ठाकरे) प्रवेश केला. मावळमधून वाघेरे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांनी खासदार




श्रीरंग बारणे यांच्याशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. खासदार संजय राऊत यांनी मावळ पुन्हा खेचून आणणार असं वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याला उत्तर देताना श्रीरंग बारणे म्हणाले की, कुणी काही बोललं म्हणजे उमेदवार विजयी होत नसतो. जे बोलले आहेत त्यांनी एक तरी सार्वजनिक निवडणूक लढवली आहे का?, ते दररोज बोलतात.. त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचं. मी कुणाच्या आव्हानाला भीक घालत नाही. पुढे ते म्हणाले की, मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये आदिवासी, दुर्गम भागामध्ये लाईट, रस्ते पोहचवले. पिंपरी चिंचवड शहराला दिवसाआड पाणीपुरवठा होत होता. आठ-नऊ वर्षे पवना धरणातून गाळ काढला. सर्वांना बरोबर घेऊन कोणतीही शासकीय मदत न घेता हा गाळ काढला. त्यामुळे शहराला आज दररोज पाणीपुरवठा होत आहे. जनतेसाठी या शहरात मी आंदोलन पुकारलं, सर्वसामान्य माणसाच्या घराला न्याय देण्याची प्रक्रिया केली. शास्ती माफ करण्याच्या संदर्भामध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसामान्य गरीब माणसाला न्याय मिळालेला आहे. जेएनपीटी पासून पनवेल पर्यंत रस्ता जाम होत होता. कंटेनर तास अन् तास उभे राहत होते. त्या ठिकाणचा रस्ता केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या माध्यमातून केला. तळेगाव ते चाकण शिक्रापूर या मार्गाचा डिपीआर मंजूर झाला आहे. त्याला केंद्र सरकार आता मंजुरी देत आहे. वाकड पासून जाणारा चांदणी चौकाचा मार्ग जवळपास साडेआठ किलोमीटरचा आपण उभा करतो आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून केंद्राच्या योजना आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या अनेक योजना या शहरापर्यंत पोहोचवण्याचं काम मी केलेल आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे माझी नाळ सर्वसामान्य जनतेशी जोडलेली आहे. मतदारापर्यंत माझा डायरेक्ट संपर्क आहे. त्यामुळे मी कुणाच्याही आव्हानाला भिक घालत नाही. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी मलाच उमेदवारी द्यायची असं ठरवलं आहे. संजोग वाघेरे यांच्या बद्दल बोलणं योग्य ठरणार नाही. कुठल्याही विरोधी पक्षाच्या उमेदवारावर मी कधी व्यक्तिगत बोलत नाही. मावळ लोकसभा मतदारसंघात केलेल्या कामाच्या जोरावर मी निवडणूक लढवणार आहे. मतदारच कोणाला निवडून द्यायचे हे ठरवत असतो. २०२४ चा निकाल लागेल तेव्हा श्रीरंग बारणे यांची हॅट्रिक झालेली सर्वांना दिसून येईल असं ते म्हणाले.

# विद्यार्थ्यांच्या भूमिकेत राहून नव्या गोष्टी आत्मसात करा

## डॉ. डी. वाय. पाटील बी स्कूलचा चवथा पदवीदान सोहळा उत्साहात

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** परीक्षा पास होऊन आज तुम्ही व्यवहारीक जगात प्रवेश करणार आहात. आयुष्यात नोकरी, व्यवसाय करून स्थिरावणे हे आता तुमचे उद्दीष्ट असेल. मात्र, असे जरी असले तरी कायम विद्यार्थ्याच्या भूमिकेत रहा, नव्या गोष्टी आत्मसात करा. बदलत्या काळाबरोबर स्वतःत बदल करत रहा. असे केलेत तर तुम्ही आयुष्यात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. असे मार्गदर्शन इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध लेखक, स्तंभलेख, यूट्यूबर चेतन भगत यांनी पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील बी स्कूलमधून एमबीए पदवी घेऊन बाहेर पडणार्या विद्यार्थ्यांना केले. २९ डिसेंबर रोजी डॉ. डी. वाय. पाटील बी स्कूलच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ विद्यापीठ मुख्यालयातील सभागृहात पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चेतन भगत बोलत होते. या कार्यक्रमाला प्रसिद्ध कोच



आणि आणि अध्यात्मिक मार्गदर्शक खुर्शीद बाटलीवाला आणि ध्यानधारणा विषयातील तज्ज्ञ आणि उपयोजित उपचारतज्ज्ञ दिनेश घोडके हे सन्मानीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र कुलगुरू डॉ. भाग्यश्रीताई पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एन. जे. पवार, डॉ. रोहिणीताई सोमनातह पाटील, संचालक डॉ. अमोल गावंडे, अधिष्ठाता डॉ.अतुलकुमार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेतन भगत यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन आणि भाषण यांच्या माध्यमातून ११ सूत्रे समजावून सांगितली. ते म्हणाले कधीही आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. जीवनाच्या स्पर्धेत सतत पुढे राहण्याचा प्रयत्न करा, इंग्रजी भाषा आजच्या युगात येणे आवश्यक आहे. पण साधी सोपी इंग्लिश आत्मसात करा. अगदी फर्डे इंग्लिश आलेच पाहिजे असे नाही. सतत आपल्याला साध्य करायच्या असलेल्या उद्दीष्टांचा पाठलाग करत रहा. आहे त्या परिस्थितीत ॲडजस्ट व्हायचा नेहमी प्रयत्न करा. झुरळ जसे सांदीकोपर्यात कुठेही तगून राहते तसेच प्रत्येक परिस्थितीशी जुळवून घ्या. एकदम मोठे ध्येय उराशी बाळगू नका. मोठ्या ध्येयाचे छोटे छोटे टप्पे तयार करा. ते पार करण्याचा प्रयत्न करा.

# अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

## ५० रुग्णवाहिका, ९० तज्ज्ञ डॉक्टर आणि २०० आरोग्य कर्मचारी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पेरणे फाटा येथे १ जानेवारी रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासनाने आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली असून येणाऱ्या अनुयायांसाठी तयार करण्यात आलेल्या सुविधांचा जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी परिसराला भेट देऊन आढावा घेतला. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी शिक्रापूर येथील वाहनतळ आणि विजयस्तंभ परिसराची पाहणी केली. स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशा सुविधा राहील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना माहिती देण्यासाठी सूचना फलक ठिकठिकाणी लावावेत. गर्दीचे नियोजन योग्य पद्धतीने होण्यासाठी पीएमपीएमल बसेसच्या फेऱ्या सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी दिल्या. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यावर्षी अधिक अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेवून अधिक प्रमाणात सुविधा करण्यात आल्या आहेत. २९ ठिकाणी आरोग्य कक्ष उभारण्यात आले आहे. २० फिरते दूचाकी आरोग्य पथक, ५० रुग्णवाहिका ९० तज्ज्ञ डॉक्टर आणि २०० आरोग्य कर्मचारी नियुक्त केलेले आहे. खाजगी रुग्णालयात १०० खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. पुरेशा प्रमाणात औषधसाठादेखील ठेवण्यात आला आहे. स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरिता दीडशे पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या माता-भगिनींची काळजी घेण्यात आली असून एकूण पाच हिरकणी कक्ष उभारण्यात येत आहेत. हिरकणी कक्षामध्ये स्तनदा माता व ज्येष्ठ महिला यांना तसेच त्यांच्या समवेत असलेले लहान बालकांसाठी विश्रांती तसेच बालकांच्या मनोरंजनाकरीता खेळणी साहित्य व खाऊ ठेवण्यात आला आहे. या ठिकाणी स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. परिसरातील विविध ठिकाणी एकूण २ हजार २०० तात्पुरत्या शौचालयांची उभारणी करण्यात आलेली आहे. वापराच्या पाण्यासाठी ४० टँकर आणि स्वच्छतेसाठी ४० सक्शनमशीन व १५ जेटींग मशीन ठेवण्यात आले आहेत. रस्त्यावर कचरा साचू नये याकरीता ५०० कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. स्वच्छतेसाठी २००सफाई कामागार नियुक्त करण्यात आले आहेत. कचरा उचलण्याकरिता ८० घंटागाड्या उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पोलिसांकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून नागरिकांना सुचना देण्यासाठी ठिकठिकाणी ध्वनीक्षेपकांची व्यवस्था ( पब्लीक ॲड्रेस सिस्टिम) करण्यात आली आहे. सीसीटीव्हीद्वारे परिसरावर नजर राहणार असून त्यासाठी सुसज्ज नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथाच्या शताब्दी वर्षानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून विजयस्तंभ परिसरात बार्टी संस्थेच्यावतीने पुस्तकांचे ३०० स्टॉल उभारले आहेत. बार्टी संस्थेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जीवनावरील मौल्यवान पुस्तके ८५ टक्के सवलतीच्या दरात अनुयायांना वितरण करण्यात येणार आहेत.'द प्रॉब्लेम ऑफ रुपी, भारताचे संविधान, संविधान उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ



### पुरेशा प्रमाणात औषधसाठा

» ७:३० वाजता समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. सकाळी ९:३० वाजता 'डॉ.बी.आर. आंबेडकर विज्डम बुकफेअर'चे उद्घाटन होईल, अशी माहिती बार्टीच्यावतीने देण्यात आली आहे.स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशा सुविधा राहील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना माहिती देण्यासाठी सूचना फलक ठिकठिकाणी लावावेत. गर्दीचे नियोजन योग्य पद्धतीने होण्यासाठी पीएमपीएमल बसेसच्या फेऱ्या सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी दिल्या. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यावर्षी अधिक अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेवून अधिक प्रमाणात सुविधा करण्यात आल्या आहेत. २९ ठिकाणी आरोग्य कक्ष उभारण्यात आले आहे.

# प्रकाश आंबेडकर आणि शरद पवार यांची भेट ?

## पुण्यातील मोदी बागेत भेट झाल्याने चर्चेला उधाण

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर (झॲरज्ञरीह आलशवज्ञरॲ) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (डहरॲरव झरुरॲ) यांच्यात भेट झाली असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. प्रकाश आंबेडकर हे शनिवारी रात्री पुण्यातील शरद पवार राहत असलेल्या मोदी बाग या सोसायटीत आल्याने राजकिय निरीक्षकांच्या भुवया ऊंचावल्या आहेत. तर, प्रकाश आंबेडकर यांनी पवारांसोबत भेट झाल्याचे वृत्त फेटाळून लावले आहे. मागील काही दिवसांपासून विरोधकांच्या इंडिया आघाडीत येण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीकडून जोर दिला जात आहे. तर, वंचितच्या समावेशाबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीत आपण चर्चा केली असल्याचे शरद पवार यांनी म्हणत, वंचितबाबत सकारात्मकता





दाखवली. त्यानंतर प्रकाश आंबेडकर आणि शरद पवार यांच्यात भेट झाल्याच्या वृत्ताने चर्चांना उधाण आले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे शनिवारी रात्री पुण्यातील शरद पवार रहात असलेल्या मोदी बाग या सोसायटीत आले. मात्र, प्रकाश आंबेडकरांनी मोदी बाग या सोसायटीत राहणाऱ्या आपल्या बहिणीला भेटण्यासाठी आपण आल्याच स्पष्ट केलं. या दरम्यान शरद पवारांची आणि आपली भेट झाल्याचा त्यांनी इन्कार केला आहे. प्रकाश आंबेडकर हे इंडीया आघाडीत जाण्यास इच्छुक असून शरद पवारांनी देखील त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. काही दिवसांपूर्वी या दोन नेत्यांची मुंबईत भेट झाली होती. नरेंद्र मोदी यांना सत्तेतून हटवणे हा आमचा मुख्य अजेंडा आहे असं सांगत वंचित बहुजन आघाडीने (तरपलहळीं इरहींक्षरप असहरवळ) महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला. महाराष्ट्रातील विरोधी पक्षाने प्रत्येकी १२ जागांवर निवडणूक लढवावी असं वंचितकडून आवाहन करण्यात आलं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी या चार पक्षांमध्ये लोकसभेच्या ४८ जागांची समान विभागणी करावी.

# दूध प्या संदेश देत नववर्षाचे स्वागत

## चेंज इंडिया फाऊंडेशनच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिवून बेहोष होण्या ऐवजी, दूध पेवून तरतरीत व्हा असा सकारात्मक संदेश देत कोथरुड मधील मंडळांनी दारु नको दूध प्या असे कार्यक्रम कोथरुड मध्ये ठिकठिकाणी आयोजित केले. त्याला सर्व थरातून चांगला प्रतिसाद मिळाला. चेंज इंडिया फाऊंडेशनच्या वतीने दारु नको मसाला दूध प्या या कार्यक्रमाचे आयोजन कोथरुड डेपो येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे हे बारावे वर्ष होते. यावेळी वसुंधरा परिवाराचे धनंजय झुरंगे, सारंग मोकाटे उपस्थित होते. संयोजक सचिन धनकुडे म्हणाले की, दारु बंद करणे सरकारला अशक्य वाटते म्हणून त्यांनी दारुची दुकाने आज देखील चालू ठेवली आहेत. परंतु आपल्या लोकांना चांगले वळण लावणे हे आपल्याच हातात आहे. म्हणून आम्ही दरवर्षी हा उपक्रम राबवतो. पिणे वाले को पीणे का बहाणा चाहिए म्हणतात. आम्ही त्यांना दूधाचा पर्याय देत, नवी पीढी बलशाली बणावी म्हणून प्रोत्साहन देत आहे. राजमाता जिजाऊ मासाहेब नगर (सुतारदरा) येथील शिवकल्याण मित्रमंडळ, संतोष डोख मित्र परिवाराने मसाला दुध वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले. दिपाली डोख म्हणाल्या की, आम्ही गेली चार वर्षे हा कार्यक्रम करत आहे. कष्टकरी जनतेने दारु वर खर्च करण्या ऐवजी तो पैसा आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी, कुटूंबाच्या प्रगतीसाठी वापरावा असा संदेश आम्ही या माध्यमातून देत आहे. यावेळी वरिष्ठ पोलिस निरिक्षक हेमंत पाटील, दत्ताभाऊ भगत, राजाभाऊ म्हाळुंगे, शिवकल्याण रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अमित कोंढाळकर आदी उपस्थित होते. भीमयोध्दा फाऊंडेशन महिला बचत गटाने सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी दुग्धप्रसाद प्राशन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.




### पणे वाले को बहाणा चाहिए...

**» पणे वाले को पीणे का बहाणा चाहिए म्हणतात. आम्ही त्यांना दूधाचा पर्याय देत, नवी पीढी बलशाली बणावी म्हणून प्रोत्साहन देत आहे. राजमाता जिजाऊ मासाहेब नगर (सुतारदरा) येथील शिवकल्याण मित्रमंडळ, संतोष डोख मित्र परिवाराने मसाला दुध वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले. दिपाली डोख म्हणाल्या की, आम्ही गेली चार वर्षे हा कार्यक्रम करत आहे. कष्टकरी जनतेने दारु वर खर्च करण्या ऐवजी तो पैसा आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी, कुटूंबाच्या प्रगतीसाठी वापरावा असा संदेश आम्ही या माध्यमातून देत आहे.**

# राज्यातून १७ प्रकल्प गेले मराठी लोकांचा घास पळवला

## प्रकल्प रोखण्याची राणेंची हिंमत नाही, सरकारही लाचार : संजय राऊत

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्रातून आतापर्यंत १७ प्रकल्प बाहेर गेले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डह्वळपवश), उपमुख्यमंत्री खोटे आकडे देत आहेत. ते तोंड शिवून बसले आहेत. दहशतीखाली उद्योगपती यांना घेऊन चालले आहेत. मुंबईची (चींलरळ) वाट लावण्याचे धोरण हे सरकार करत आहे. आमच्या मराठी लोकांच्या तोंडाचा घास पळून लावत आहेत. नरेंद्र मोदी (झच् परॲशपवॲर ेवळ) म्हणतात आधी गुजरातचा विकास मग देशाचा, कुठल्याही पंतप्रधान यांनी असे भाष्य केले नव्हते. तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात एका राज्याचे नाहीत. मी म्हणतो त्यांनी गुजरातला सोन्यानं मढवून द्वारका करा, आमचं काहीच म्हणणं नाही. आधी गुजरातचा विकास आणि मग देशाचा विकास अशी भाषा देशाचे पंतप्रधान करतात..असं कुणीच कधी बोललं नाही. आमचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री लाचार झाले आहेत. नारायण राणे यांच्यातही ताकद नाही की उद्योग बाहेर चालले आहेत त्यावर बोलावे, असा हल्लाबोल शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केलाय. ते पुण्यात बोलत होते. नारायण राणे, एकनाथ शिंदे शिवसेनामध्ये होते ना तर त्यांनी तो बाणा दाखवावा. अजित पवार तुम्ही शरद पवार यांचे नाव सांगता, मग सांगा ना की राज्यातून एक ही प्रकल्प बंद होऊ देणार नाही म्हणून असेही राऊत म्हणाले. राम मंदिर सोहळा आनंदाचा क्षण आहे. देशाचा सोहळा पाहिजे हा तर आता भाजप सोहळा झाला आहे. भाजपने राम मंदिर सोहळा राजकीय केलाय. अक्षदा वाटत आहेत



की जणू एक लग्न सोहळा आहे. राम मंदिरासाठी शिवसेनेने बलिदान दिले त्याला आम्हाला कुठले ही गालबोट लावायचे नाही पण आम्ही योग्य वेळी बोलू, असा इशारा यावेळी संजय राऊतांनी दिला. महा विकास आघाडीमध्ये जिंकेल त्याची जागा आहे. जयंत पाटील यांनी शिवसेनेशी चर्चा केली आहे. जागा वाटपाचा संदर्भात कोणताही मतभेद नाही. मुंबईत कोण काय बोलतात यावर जाऊ नका, असे राऊत म्हणाले. प्रकाश आंबेडकर सकारात्मक आहेत. हुकुमशाही बदलून टाकण्यासाठी ते ठाम आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्या सभा बघितल्या असतील तर ते लढाई मध्ये उतरले आहेत. सामंजस्य पणे ते भूमिका बजावत आहेत, असे संजय राऊत म्हणाले. शेतकऱ्यांची दुरावस्था ही सरकारचं हे अपयशच आहे. महाराष्ट्राचं सरकार जो मोदी मोदी करतायत, त्यातले शिंदे आणि अजित पवार कालपर्यंत त्यांच्या शेतकरी धोरणावर टीका करत होते. विदर्भात गेल्या दीड वर्षात १२०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. अजूनही जर हे सरकार म्हणत असेल की सगळं काही आलबेल आहे तर ते खोटं बोलतायत गेल्या दोन वर्षांत काय केलं तर फक्त आमदार-खासदारांचा भाव वाढवला, असे संजय राऊत म्हणाले. हे सरकारच रेव्ह पार्टी आहे. सरकार म्हणेजच रेव्हपार्टीतून निर्माण झालंय. अख्ख्या महाराष्ट्रात नशेचा व्यापार सुरू आहे. गुजरातमधून महाराष्ट्रात ड्रग्स येतायत. महाराष्ट्राचा पंजाब करण्याचा हा प्रयत्न आहे. देशात भाजपचं सरकार आल्यापासून साडेतीन लाख कोटींचं ड्रग्स गुजरातच्या बंदरातून पकडलं आहे. तुम्ही या देशातील तरूणांना नशेत धुत करून राज्य करू इच्छिताय का? असे राऊत म्हणाले.महाराष्ट्रातून आतापर्यंत १७ प्रकल्प बाहेर गेले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डह्वळपवश), उपमुख्यमंत्री खोटे आकडे देत आहेत. ते तोंड शिवून बसले आहेत. दहशतीखाली उद्योगपती यांना घेऊन चालले आहेत. मुंबईची (चींलरळ) वाट लावण्याचे धोरण हे सरकार करत आहे. आमच्या मराठी लोकांच्या तोंडाचा घास पळून लावत आहेत. नरेंद्र मोदी (झच् परॲशपवॲर ेवळ) म्हणतात आधी गुजरातचा विकास मग देशाचा, कुठल्याही पंतप्रधान यांनी असे भाष्य केले नव्हते. तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात एका राज्याचे नाहीत. मी म्हणतो त्यांनी गुजरातला सोन्यानं मढवून द्वारका करा, आमचं काहीच म्हणणं नाही. आधी गुजरातचा विकास आणि मग देशाचा विकास अशी भाषा देशाचे पंतप्रधान करतात..असं कुणीच कधी बोललं नाही. आमचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री लाचार झाले आहेत. नारायण राणे यांच्यातही ताकद नाही की उद्योग बाहेर चालले आहेत त्यावर बोलावे, असा हल्लाबोल शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केलाय. ते पुण्यात बोलत होते.